**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - जितेंद्र रमेश पेडणेकर
वय - ४२ वर्षे
व्यवसाय - नोकरी
रा/ने -मालवण पोलीस ठाणे

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. दि. २९/०८/२०२५ रोजी माझी नेमणूक मालवण पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणून होती. सदर दिवशी मी गस्तीवरअसताना माहिती मिळाली की, देवबाग सांताक्रुझवाडी येथे इरमित रेमेत लुद्रीक ही आपल्या राहत्या घराच्या शेजारी चोरटा दारु विक्रीचा व्यवसाय करत आहे. सदर माहिती मी पोलीस निरिक्षक जगताप साहेब यांना सांगितली. त्यांच्या आदेशावरुन मी व माझयासोबत पोहेकॉ ४८ जे.एस.कुडाळकर बातमीच्या ठिकाणी पोहोचलो. त्या ठिकाणी पोहेकॉ कुडाळकर यांनी दोन पंच नामे रंजन कोळंबकर व भानुदास विष्णू येरागी यांना बोलावून घेतले. त्यांना गुन्हयाची समज देवून पंचनामा करण्यासाठी विनंती केली. त्यांनी विनंतीला होकार दिला.

२. आम्ही सांताक्रुझवाडी येथे आरोपीच्या घराच्याकडे पायी चालत जात असताना एक महिला हातात किलतानाची पिशवी घेवून पडवीच्या आडोशाला लपताना दिसली. तिचा आम्हाला संशय आल्याने आम्ही तिला जागीच थांबवून तिच्या हातातील पिशवीची खात्री केली. त्यामध्ये गोवा बनावटीच्या बॉब्स लेमन व्होडकाच्या १८० मिली मापाच्या १२ बाटल्या मिळून आल्या. आम्ही तिचे नावागावाची खात्री केली असता तिने तिचे नाव इरमित रेमेत लुद्रीक रा. सांताक्रुझवाडी ता. मालवण असे सांगितले. तिचेकडे दारु विक्रीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता तिने परवाना नसल्याचे सांगितले. तसेच सदर माल विक्री करण्यासाठी आणल्याचे सांगितले. आढळून आलेला मुद्देमाल

पंचासमक्ष पोहेकॉ ४८ जे.एस.कुडाळकर यांनी जप्त केला. जप्‌ केलेला मुद्देमालापैकी दोन बाटल्या प्रत्यंतरासाठी काढून घेवून त्यावर पंचाच्या व साहेबांच्या सहीचे लेबल चिकटवून सिलबंद केल्या. तसेच उर्वरित मुद्देमाल कार्यालयात जमा केला. मी कार्यालयात येवून आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. साक्षीदारास दि. २९/०८/२०२५ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२** दिली आहे. मी आरोपीस दाखविल्यास ओळखू शकतो. ती आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञा श्रीमती आर.ए.मोंडकर यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाचा सर्व्हे नंबर हिस्सा नंबर मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या आजूबाजूला राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनास्थळाच्या आजूबाजूला रिसॉर्ट आहेत. हे म्हणणे खरे आहे की, देवबाग येथे बऱ्याच प्रमाणात हॉटेल व रिसॉर्ट आहेत. हे म्हणणे खरे आहे की, देवबाग येथे पर्यटकांची संख्या बऱ्याच प्रमाणात असते.

३. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल जप्‌ केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणातील पंच नेहमीचे पंच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंच भानुदास विष्णू येरागी हा देवबाग गावचा पोलीस पाटील आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा हा घटनास्थळावर करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर सहया घटनास्थळावर न घेतापोलीस स्टेशनवर घेण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यंतरासाठी दोन बाटल्या काढून घेतल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बेवारस मुद्देमाल आरोपीच्या माथी मारुन तिचेविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. ०६/०५/२०२६

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.